# Department of NCC
# Event/Activity details
# 2023-24

| **Event Tile** | **NCC DAY** |
|---|---|
| Organized By | NCC Department in collaboration with 38 MAH Bn NCC, Solapur |
| Date of Organization | 26th November, 2023 (4th Sunday) |
| Description | NCC Day was celebrated on 26th November, 2023. College (Ex-NCC Cadet 2015-16 Batch) Tanaji Gawade 14th IDSR, Infantry Div-Signal Regiment, (Posting - Deharadun) and Ulkesh Salunkhe (Ex-NCC Cadet 2017-18 Batch) 136 Field Regiment (Posting-Jammu) were the Chief Guest of the program. |
| Photographs |     |

माणदेशाच्या विकासावर दृष्टिक्षेप टाकणारे पुरोगामी विचारसरणीचे एकमेव दैनिक

# माणदूत एक्सप्रेस

स्थापना २००२

www.mandootexpress.com

email- mandootexpress5@gmail.com

संपादक–मोहन मस्के मो.९८५०४०३७७३

■सांगोला, पंढरपूर, मंगळवेढा, माळशिरस, आटपाडी, जत, सोलापूर, सांगली, फलटण ■

पृष्ठे–४ मूल्य – १ रुपये गुरुवार दि.३० नोव्हेंबर २०२३

## सांगोला महाविद्यालयात एन.सी.सी. दिन साजरा

सांगोला (प्रतिनिधी):- सांगोला महाविद्यालयात एन.सी.सी. दिनाचे आयोजन करण्यात आले होते. ३८ महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी. सोलापूर यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. १५जुलै १९४८ साली प्रथम एन.सी.सी.ची स्थापना स्वतंत्र भारतात करण्यात आली. १९४८ साली नोव्हेंबर महिन्याच्या चौथ्या रविवारी दिल्ली येथे प्रथम एन.सी.सी.ची संचालनालयाची स्थापना करण्यात आली. तेव्हापासून नोव्हेंबर महिन्यातील चौथा रविवार हा एन.सी.सी. दिन म्हणून साजरा करतात. हे वर्ष ७५ वे स्थापना वर्ष आहे. या निमित्ताने महाविद्यालयात व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयातील एन.सी.सी.चे माजी कॅडेट १४ IDSR इन्फंट्री डिव्ह सिग्नल रेजिमेंट डेहराडूनचे तानाजी गावडे व १३६ फिल्ड रेजिमेंट जम्मूचे उल्केश साळुंखे उपस्थित होते. या प्रसंगी बोलताना उल्केश साळुंखे यांनी छात्रांना एन.सी.सी. चे महत्व सांगितले.

एन.सी.सी. मध्ये जे ट्रेनिंग मिळते त्यामुळे मुख्य भरतीच्या वेळी याचा फायदा होतो. त्याचबरोबर भरती पश्चात जे प्रशिक्षण दिले जाते ते करणे सोपे जाते. म्हणून छात्रांनी आता एन.सी.सी. चा चांगला फायदा करून घ्यावा असा महत्त्वपूर्ण सल्ला त्यांनी याप्रसंगी दिला.

कार्यक्रमाचे अध्यक्षपद महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सुरेश भोसले यांनी भूषविले. छात्रांना मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, विद्यार्थी दशेत जी एन.सी.सी. ची संधी छात्रांना मिळाली आहे, त्याचा जास्तीत जास्त फायदा करून घ्यावा. त्यांना आवश्यक असणाऱ्या सर्व सेवा-सुविधा महाविद्यालयातून पुरविल्या जातील. सैन्य दलात भरती होण्यासाठी छात्रांनी प्रयत्न करावेत. तसेच प्रमुख पाहुण्यांचे स्वागत व कौतुक त्यांनी याप्रसंगी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार एन.सी.सी. कंपनी कमांडर कॅप्टन संतोष कांबळे यांनी केले. याप्रसंगी एन.सी.सी. चे सर्व छात्र उपस्थित होते.